# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

<u>**अत्यंत तातडीचे/महत्वाचे**</u>

क्रमांक संगाबाअवि/३/संपमूम/१५३/२०२२
दिनांक : ६/०६/२०२२

प्रति,

प्राचार्य / विभागप्रमुख / मानद संचालक,
सर्व संलग्नीत संबंधीत महाविद्यालये, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदवी व पदव्यूत्तर शैक्षणिक विभाग
मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा,

**विषय :- विद्यापीठ परीक्षा उन्हाळी-२०२२ मधील परीक्षा संचालनाच्या कार्यपद्धतीविषयी सर्व विद्यार्थ्यांना माहिती पुरविण्याबाबत.**

**संदर्भ :-** क्रमांक संगाबाअवि/३/संपमुमं/४९४/२०२२, दिनांक ११ मे, २०२२

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भाकिंत विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील उन्हाळी-२०२२ परीक्षेकरीता पात्र विद्यार्थ्यांच्या (वार्षिक व सत्र पद्धती ) परीक्षा संचालनाची कार्यपद्धती Annexure-I नुसार आपणास पाठविण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे कार्यपद्धती अवलंबून परीक्षांचे संचालन करण्यात यावे. तथापि, सर्व विद्यार्थ्यांना नमूद कार्यपद्धतीविषयी अचूक माहिती प्राप्त होण्याकरीता खालीलप्रमाणे सर्व सूचना विद्यार्थ्यांना प्रत्येक परीक्षेच्या प्रत्येक पेपर सुरु होण्यापूर्वी न चुकता पर्यवेक्षकामार्फत देण्यात याव्यात, या सर्व सूचना सर्व संबंधित पर्यवेक्षकांना अवगत करुन द्याव्यात. तसेच परीक्षा केंद्रावरील दर्शनीभागात सर्व परीक्षार्थ्यांना दिसतील अशा ठिकाणी सदर सूचना लिहिण्यात याव्यात.

१) प्रश्नपत्रिकेमध्ये मुद्रीत केलेल्या सूचना/ Note रद्द समजण्यात याव्यात. उदाहरणार्थ-अ) सर्व प्रश्न आवश्यक आहेत. ब) OR, अथवा, किंवा अशा प्रश्नपत्रिकेतील सूचना रद्द समजण्यात याव्यात.

२) परीक्षार्थ्यांनी प्रश्नपत्रिकेवर नमूद असेलले एकुण गुणांचे (Maximum Marks) कोणतेही प्रश्न सोडवावयाचे आहेत. उदाहरणार्थ-जर प्रश्नपत्रिकेवर एकुण गुण (Maximum Marks) ८० लिहिलेले असतील, अशा प्रश्नपत्रिकेत OR, अथवा, किंवा वगळून ८० गुणांच्या वर प्रश्न होत असतील, अशा वेळी परीक्षार्थ्यांनी कोणतेही ८० गुणांचे प्रश्न सोडवावेत.

३) परीक्षार्थ्यांनी ८० गुणांपेक्षा कमी गुणांचे प्रश्न सोडविले असल्यास त्याला प्राप्त झालेले गुणांचे गुणदान करण्यात येईल.

४) परीक्षार्थ्याने जर प्रश्नपत्रिकेत मुद्रित केलेल्या एकुण ८० गुणांपेक्षा जास्त प्रश्ने सोडविली असल्यास परीक्षार्थ्याला मिळालेल्या गुणांच्या अनुपातात गुणदान करण्यात येईल. उदाहरणार्थ-एखादी प्रश्नपत्रिका ८० गुणांची आहे, परंतू परीक्षार्थ्याने ९० गुणांचे प्रश्न सोडविले असतील व त्याला ९० पैकी ४५ गुण प्राप्त झाले असतील तर ८० पैकी ४० गुण परीक्षार्थ्यास मूल्यांकनानंतर रुपांतरीत करुन गुणदान करण्यात येईल.

५) उन्हाळी-२०२२ परीक्षेमध्ये सर्व परीक्षार्थ्यांना प्रतितास १५ मिनीटांचा अतिरिक्त वेळ प्रश्न सोडविण्यासाठी देण्यात आलेला आहे. या व्यतिरिक्त दिव्यांग विद्यार्थ्यांना अध्यादेश क्रमांक २/२०२१ नुसार अतिरिक्त वेळ देण्यात येईल. अध्यादेश क्रमांक 2 of 2021 मधील 4(vi) मध्ये तरतूद पुढीलप्रमाणे आहे. “Differently able students of all categories will be given additional 20 minutes per hour besides the stipulated time span.

**उपरोक्त सर्व सूचना परीक्षार्थ्यांना देण्यात याव्यात, व उन्हाळी-२०२२ परीक्षा सुचारु पद्धतीने पार पाडण्यास विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.**

आपला,

(डॉ.हेमंत आर.देशमुख)
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

259Narwade Sir